जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ३९५ दिनांक - २६/०९/२०२४**

भारती विदयापीठ पोलीस स्टेशन, पुणे शहर

## सराईत गुन्हेगारास गावठी पिस्टलसह जेरबंद

भारती विदयापीठ पोलीस ठाणे हदद्ीत पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार गुन्हे प्रतिबंधक पेट्रोंलिंग करीत असताना स.पो.फौ. नामदेव रेणुसे व सतिश मोरे यांना बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, रेकॉर्डवरील आरोपी **अभय उर्फ अजय अशोक निसर्गंध वय २४ वर्षे रा.सिध्दिविनायक कॉलनी सप्तगिरी वाघजाई मंदिराजवळ जांभुळवाडी रोड** हा भुमकर चौकाकडुन स्वामी नारायण मंदिराकडे जाणाऱ्या रोडवर कमरेला पिस्टल लावुन थांबला आहे अशी माहिती मिळाल्याने बातमीची खात्री करुन सहा.पोलीस निरीक्षक समीर शेंडे, व स्टाफ असे सदर ठिकाणी जावुन आरोपीचा शोध घेत असताना स्वामी नारायण मंदिरकडे जाणाऱ्या रोडवरील अप्पाज हॉटेलच्या पाठीमागील बाजुस आरोपी अभय उर्फ अजय अशोक निसर्गंध हा थांबला असल्याचे दिसुन आल्याने त्यास पकडुन त्याचेकडे चौकशी करीत असताना तो त्याचे कमरेमध्ये काही तरी लपवुन उडवाडवीची उत्तरे देवू लागला त्यावेळी त्याचा संशय आल्याने त्याचे कमरेची पाहणी केली असता त्याचे जवळ ५०,०००/-रुपये किंमतीचे एक गावठी बनावटी पिस्टल व १००० रु.किंमतीचे एक जिवंत काडतुस असा एकुण ५१०००/- रुपये किंमतीचा मुददेमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदर बाबत भारती विदयापीठ पोलीस स्टेशन,पुणे शहर येथे गु.र.नं.७५१/२०२४ शस्त्र अधिनियम १९५९ कलम ३,२५ सह महा.पो.अधि कलम ३७(१)(३),१३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई मा.पोलीस उप आयुक्त परिमंडळ २ श्रीमती स्मार्तना पाटील, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग, श्रीमती नंदिनी वग्यानी, वरीष्ठ पोलीस निरीक्षक भारती विद्यापीठ पो.स्टे. श्री.दशरथ पाटील, पो.नि.गुन्हे, श्री.शरद झिने, यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि समीर कदम, सपोनि समिर शेंडे, पोउनि निलेश मोकाशी, स.पो.फौ.नामदेव रेणुसे, शैलेंद्र साठे पोलीस अंमलदार चेतन गोरे, हनुमंत मासाळ, महेश बारावकर, निलेश ढमढेरे, निलेश जमदाडे, मंगेश पवार, सतीश मोरे, अवधतु जमदाडे, सचिन सरपाले, निलेश खैरमोडे, धनाजी धोत्रे, सचीन गाडे, मितेश चोरमोले, अभिनय चौधरी, सागर बोरगे यांच्या पथकाने केली आहे.


भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन
पुणे शहर
पुणे पोलीस